लो. टिळक ग्रंथ संग्रहालय

वाई (जि. सातारा)

क्रमांक १५१५८ / इति

ग्रंथाचे नाव तीर्थराज श्रीवाराणशी क्षेत्र

लेखकाचे नाव

विषय इतिहास

(२०१)

ग्रंथ संग्रहालय वाई, जि. उत्तर सातारा
दा. अंक. २६३
चि. अंक. २१८

१५१५८

१९वे शतक

इति

## वांई ग्रंथसंग्रहालय.

पु. न.

१ पुस्तक ८ दिवसानंतर बाहेर ठेऊं नये

२ पुस्तकाबद्दल गहाळपणा झाल्यास नुकसान भरून घेतलें जाईल.

३ पुस्तक नेमल्यावेळीं परत करावें.

४ पुस्तक दुसऱ्या कोणास देऊं नये.

१५११८८। ३ रि।/२३१

... ग्रंथ संग्रहालय
दा. अंक २६३
वि. अंक २५८/९८
वाई, जि. उत्तर सातारा.

टिळक ग्रंथसंग्रहालय
दा. क्र.
वाई जि. सातारा

Presented to "THE PRIVATE FREE LIBRARY-Dharmapuri, Wai" by K. V. Pandit. in memory of his uncle the late Mr. Bapusaheb Pandit.
१२२९

॥ श्री ॥

# तीर्थराज.

## श्री वाराणशी क्षेत्र.

असारे खलु संसारे सारमेतच्चतुष्टयम् ॥
काश्यांवासः सतां संगो गंगांभः शंभुसेवनम् ॥

अर्थ—ह्या रुक्ष संसारामध्यें काशीवास, साधुसमागम, भागीरथीचें जल आणि श्री विश्वेश्वराचीसेवा हीं चारच कायती सेवनीय आहेत.

" यत्रैव गंगा यमुना सरस्वती ॥
स तीर्थराजो जयति प्रयागः " ॥

पुराणांतरी अशी कथा सांपडते कीं, ब्रह्मदेवानें एकदां सर्व तीर्थें आणि प्रयाग यांची तुलना केली, त्या-वेळीं सर्व तीर्थांचें पारडें खालीं बसलें, ह्मणून त्यानें प्रयागतीर्थ हें सर्वांत श्रेष्ठ आहे असें ठरवून, त्यास ' तीर्थराज ' असें नांव दिलें.

बनारस ऊर्फ काशी, हें भरतखंडातील अत्यंत पवित्र प्राचीन क्षेत्र होय. ह्याचें पूर्वीचें नांव वाराणशी. त्याचा बनारस हा अपभ्रंश होय. सुमारें ८०० वर्षांपूर्वी बनार नामक राजानें हें शहर बांधलें ह्मणून त्यास बनारस ह्मणतात.

हें भरत खंडांतील जगविख्यात पुण्यक्षेत्र उत्तर प्रदेशांत उत्तर वाहिनी गंगा भागीरथी नदीच्या पश्चिम तीरीं फार प्राचीन कालापासून वसलेलें आहे. भरत-खंडांतील सर्व क्षेत्रांपेक्षां हें स्थान आदि क्षेत्र असून विद्याविलासाचें मंदीर, अनेक सत्पुरुषांचें निवास स्थान, आणि नानाविधज्ञानाचें भांडारगृह, असें हें जगदोद्धारक अत्यंत पवित्र व सर्वमान्य क्षेत्र आहे. या क्षेत्राचें ऐतिहासिक वर्णन स्कंदपुराणांतरगत **काशी**खंडांत शंभर अध्यायांत केलें आहे.

यांत **काशी** ( अविमुक्तपुरी ) कशी निर्माण झाली, तेथें देवादिकांचा प्रादुर्भाव कसा झाला, आणि पृथ्वीवरील सर्व क्षेत्रांत यासच श्रेष्ठता कशानें आली, या विषयीं सविस्तर वर्णन आहे परंतु या लहानशा पुस्तकांत स्थलसंकोच्यामुळें त्यांतील मुख्य मुख्य कथानकाचें तात्पर्य मात्र सांगतों.

ज्या समयीं प्रलयकाल प्राप्त झाला होता त्या कालीं सर्व जगताचा पसारा ब्रह्मस्वरुपीं लीन होऊन निर्गुण निर्विकार परिपूर्ण भरलेलें एक ब्रह्म मात्र होतें. कांहीं काल गेल्यावर त्या निर्गुण ब्रह्मापासून सगुण ब्रह्म प्रकृती सहित प्रगट झालें. ही सगुण प्रकृती आरंभीं ज्या क्षेत्रांत प्रगट झाली. त्या क्षेत्रास **काशी** असें नांव पडलें. हें क्षेत्र जगताचा प्रलयकाल असतां प्रकाशमय असून आदि पुरुषाचें निवासस्थान होतें ह्मणून **अवि-मुक्त** क्षेत्र असें दुसरें नांव पडलें. पुढें या आदिक्षेत्रांत आनंददायक सृष्टिवैभवाचीं नानाविध कंदबीजें निर्माण होऊन त्या आनंदकंद बीजांपासून अंकुरोद्भव होऊन

नानाविध सृष्ट पदार्थांची वृद्धी होऊं लागली ह्मणून या क्षेत्रास ' **आनंदवन** ' असें नांव पडलें.

याप्रमाणें हें अगाध **विश्वनाथाचें** निजधामस्थान ' **काशीपुरी** ' उदय पावल्यावर सगुण पुरुषाच्या आदिशक्ति ( इच्छे ) पासून **चक्रधारी विष्णू** निर्माण झाला; व त्याकालीं **काशीक्षेत्रीं भागीरथी** नदी नव्हती ह्मणून **विष्णूनीं** चक्रानें जमीन खणून एक उदकानें परिपूर्ण असा दिव्यकूप निर्माण केला हा कूप चक्रानें निर्माण केला ह्मणून यांस **चक्रपुष्करणी** असें नांव पडलें; आणि **काशी** क्षेत्रांत हेंच आदितीर्थ झालें. या तीर्थाच्या ठिकाणीं कांहीं काल पर्यंत **विष्णूनी** तपश्चर्या केली, तेव्हां आदिशक्ती **भवानी** सहित **विश्वनाथ** त्या ठिकाणीं साक्षात् प्रगट होऊन **विष्णूस** भेट दिली; आणि तें **चक्रपुष्करणी** सरोवर पाहून परम आनंदानें नृत्य करूं लागले. त्या कालीं **विश्वेश्वराच्या** कर्णांतील मणी त्या **चक्रपुष्करणी** सरोवरांत पडला; तेव्हांपासून या **चक्रपुष्करणी** सरोवरास ' **मणि कर्णिका** ' असें नांव प्रसिद्ध झालें. आतां काशी क्षेत्रीं भागीरथी कशी प्राप्त झाली तें सांगतों. मेरु पर्वताची **मेनका** नामक कन्या **हिमालयास** दिली होती व तिजपासून **पार्वती** व **गंगा** अशा दोन कन्या उत्पन्न झाल्या. त्यांत **पार्वतीला** देवांनीं **पशुपतिला** अर्पण केली व गंगा ही पवित्र व जगदोद्धारिणी असें जाणून आपल्या अमरपुरींत नेऊन ठेविली त्यानंतर सूर्यवंशांतील **सगर** राजाचा पुत्र **अंशुभान** हा अश्वमेध करीत असतां इंद्रानें या राजाची स्पर्धा करून त्याचा यज्ञाचा अश्व चोरून पा-

ताळीं नेऊन ठेविला. **अंशुमान** राजाला साठ सहस्त्र भाऊ होते. तेव्हां ते गेलेल्या अश्वाचा शोध लावण्या करितां चारी दिशेला गेले. तदनंतर जेव्हां राजाला समजलें कीं अश्व पाताळीं नेला आहे तेव्हां तो व त्याचे बंधू पाताळीं जावयास निघाले. तों दिग्जानें त्यांस असें सांगितलें कीं, पाताळास जाण्याच्या मार्गांत राजाचे पूर्वज जळताहेत व त्याकरितां त्यानां विझविल्याविना त्याणीं पुढें जाऊं नये.

हें ऐकून **अंशुमान** राजा चिंताग्रांत झाला परंतु लगेच **गरुडानें** येऊन त्यास सांगितलें कीं, **गंगा** या लोकीं आणिली ह्मणजे त्याचे पितर सहजीं निवतात नंतर तो व त्याचे भाऊ हे गंगा भूलोकीं आणण्याकरितां **ब्रह्मदेवाची** तपश्चर्या करूं लागले. त्यांतच ते सर्व मरण पावले; व नंतर **अंशुमानाचा** पुत्र **दिलीप** हाही तपश्चर्या करूं लागला व त्याचाही शेवट त्यांत झाला. पुढें दिलीपाचा पुत्र **भगिरथ** याणें महा उग्र तपश्चर्या करून **ब्रह्मदेवास** प्रसन्न करून घेतलें आणि गंगेस मृत्युलोकीं पाठविण्यास विनंती केली. **ब्रह्मदेवाच्या** आज्ञेनें गंगा यालोकीं येण्यास निघाली. तेव्हां तिचा वेग सहन करून कोणाच्यानें आणवेना. मग ती पहिल्यानें कैलासपर्वतीं **महादेवाच्या** जटेंत जाऊन राहिली. तेथून तिचे सात प्रवाह झाले व त्यापैकीं **सीता** नामक प्रवाह पूर्वेकडे निघाला, वाटेंत जन्हु नामक ऋषी तपश्चर्या करीत बसला होता. त्याणें त्या प्रवाहाचें प्राशन केलें परंतु पुढें भगीरथाच्या प्रार्थनेवरून तोच प्रवाह त्याणें आपल्या मांडींतून पुढें सोडि-

ला; व त्यावरून त्या नदीस **जान्हवी** हें नांव प्राप्त झालें. प्रयाग क्षेत्राजवळ या नदीस यमुना येऊन मिळाली आहे. मग त्यापुढें हीस **मंदाकिनी** हें नांव आहे. भगीरथ राजानें पहिल्यानें गंगेस भूलोकीं आणिलें ह्मणून तिला **भागीरथी** असेंही ह्मणतात. ही पुढें काशी क्षेत्राजवळ उत्तर वाहिनी आहे व तेथें पुष्करणीचा संगम होऊन तसीच पुढें ४०० कोस वाहत जाऊन पुष्कळ मुखांनीं समुद्रास मिळाली आहे.

**काशी** क्षेत्र विश्वनाथाचें निवासस्थान असोन त्या आदिपुरुषाच्या इच्छामात्रें करून **ब्रह्मदेव** निर्माण झाला नंतर त्या सृष्टिकर्त्याच्या मानस पुत्रापासून सत्व, रज आणि तम अशी त्रिगुणात्मक सृष्टीची रचना झाली. त्याच्या चौऱ्याऐंशीं लक्ष योनी आहेत. २१ लक्ष योनी अंडज, सर्पजाती ९, जलचरजाती ४, पक्षिजाती ८, २१ लक्ष श्वेदज योनी, तारामंडळ ९, कुलाचल ८, रसजा धातू ४, २१ लक्ष जारज योनी, मानव ९, उपवनांतील श्वापदें ८, श्वापदें ४, २१ लक्ष उद्भिज योनी, तृणजाती ९, क्षीरसागरजाती ८, सुगंधजाती ४ या प्रकारची ८४ लक्ष बीजें निर्माण होऊन त्यांपासून पुढें विस्तार झाला. त्याकाळीं काशी क्षेत्रीं या बीज देवताचीं द्योतक लिंगें स्थापन झालीं आहेत तीं १ अंडजेश्वर, २ श्वेदेश्वर, ३ जारजेश्वर, ४ उद्भिजेश्वर, ५ नवनिधेश्वर, ६ अष्टसिद्धेश्वर, ७ पर्वतेश्वर, ८ पृथ्वीश्वर, ९ जीवेश्वर, १० संगेश्वर' ११ तेजेश्वर, १२ वनस्पतेश्वर, १३ तृणेश्वर. या लिंगांची स्थापना शिव सान्निध्य झाली. पुढें सृष्टि-

विस्तार वाढत चालला तसतसे अनेक श्रेष्ठ लोक या पुण्य क्षेत्रीं येऊन विश्वेश्वर कृपेनें इच्छित सिद्धी पावले. त्यानीं परोपकारार्थ आपापल्या नावांनें लिंगें स्थापन करून देवालयें बांधिलीं. तेव्हां त्यांस शिव प्रसन्न होऊन त्या सर्व लिंगांत अंतर्धान पावले.

नंतर देवांनीं **काशी** क्षेत्रीं दुष्टांचा प्रवेश होऊं नये ह्मणून **अशी** आणि **वारुणा** या दोन नद्या निर्माण करून क्षेत्राच्या दक्षिणेस अशि व उत्तरेस वरुणा अशा उत्पन्न केल्या. आणि पश्चिम भागीं **सांबाची** आज्ञा घेऊन **देहलीविनायक** नामें गणपतीची स्थापना केली.

या दोनी नद्या भागीरथीस काशी जवळच मिळाल्या आहेत. व यावरून काशीस **वाराणशी** असें ह्मणूं लागले. नंतर " वाराणशी " त्याचा अपभ्रंश होऊन उर्दूत **बनारस** हें नांव प्राप्त झालें.

आतां काशी क्षेत्रीं काळभैरव, दंडपाणी, आणि ज्ञानवापीतीर्थ हीं स्थानें अत्यंत प्राचीन आहेत. तर त्यांची उत्पत्ती कशी झाली तें सांगतों.

**कालभैरव.** कोणें काळीं **ब्रह्मदेव** आणि **विष्णू** यांस मोह प्राप्त होऊन सर्वांत आपण श्रेष्ठ असें उभयतां वाद करूं लागले. याप्रमाणें वाद चालला असतां असें ठरलें कीं चार वेद सांगतील तें खरें. मग साक्षात् वेदपुरुषाजवळ येऊन प्रश्न केला. तेव्हां वेद स्मृती बोलल्या कीं, दिगंबर गुणातीत निर्गुणाकार मूर्तिमंत होऊन काशी क्षेत्रीं वास करणारा शिव तेंच परब्रह्म परमतत्व होय. या प्रमाणेंच प्रणव ज्यास वेदादी

ह्मणतात त्यानेंही सांगितलें तथापी ब्रह्मदेव व विष्णू यांचा मोह दूर झाला नाहीं तेव्हां तेथें एक साक्षात् ज्योती प्रगट झाली तें रुद्रस्वरूप पाहून ब्रह्मदेव गर्वानें ह्मणाला कीं हे रुद्रा तूं माझ्या भालापासून झालास ह्मणून तूं माझा पुत्र आहेस. हें वचन ऐकून सांबास मोठा क्रोध आला आणि त्या क्रोधापासून एक भयंकर पुरुष निर्माण झाला तेव्हां शंकरानीं त्यास सांगितलें कीं तूं काळासही भयकर्ता होशील ह्मणोन तुझें नांव **काळभैरव** होईल. व तूं संपूर्ण जगाचा रक्षणकर्ता, भक्तजनांची पापें भक्षण करणारा, काशीक्षेत्रांत पाप कर्मं करणाऱ्यास शासन करणारा आणि काशींतील सर्व गणांचा अधिपती होऊन क्षेत्राचें संरक्षण करणारा होशील. शिवानीं असा त्यास वर देऊन ब्रह्मदेवास गर्व झाला आहे त्याचें शासस करण्यास सांगितलें. असें शिवानीं सांगतांच **भैरवानें** वामांगुळीचे नखाग्रानें ब्रह्मदेवाचें पांचवें शिर छेदून टाकिलें तेव्हां **विष्णू** व **ब्रह्मदेव** यांचा मोह दूर होऊन रुद्रजाप्यें करून शिवाचें स्तवन करूं लागले. नंतर भैरवास शिवानीं सांगितलें कीं तुला ब्रह्महत्येचें पातक लागलें याकारितां तूं तीर्थयात्रा कर व जेथें हें ब्रह्मकपाल खालीं पडेल तेथें या दोषापासून मुक्त होशील असें सांगून शिव अंतरधान पावले. नंतर भैरवानें सर्व तीर्थयात्रा करून वाराणशी क्षेत्रीं आल्यावर तेथें ब्रह्मकपाल खालीं पडलें. तेव्हांपासून भैरव काशींत राहिला.

**दंडपाणीची** स्थापना. पूर्वीं गंधमादन पर्वतावर **रत्नभद्र** यक्षाचा पुत्र **पूर्णभद्र** हा धर्माचारसंपन्न म-

हान विद्वान होता. त्याची भार्या **कनककुंडला** नामें महान साध्वी पतिव्रता होती. उभयतां सद्धर्मेंकरून रहात असतां पुष्कळ दिवस गेले परंतु पोटीं पुत्रसंतान नाहीं ह्मणून उभयतांही अत्यंत विव्हळ झालीं आणि विचार केला कीं, व्यर्थ शोकयुक्त राहण्या पेक्षां उद्योग करावा हें बरें. मग **कनककुंडलेनें** पतीस सांगितलें कीं आपण **शिवाची** आराधना करा ह्मणजे आपली इच्छा पूर्ण होईल. हें भार्येचें भाषण ऐकून पूर्णभद्रास बरें वाटलें आणि स्त्रीसहीत **वाराणशी** क्षेत्रीं येऊन दृढ निश्चयानें नादेश्वर नामक लिंगाची आराधना करूं लागला नंतर कांहीं दिवसांनीं त्याचा निश्चय पाहून **विश्वनाथ** प्रसन्न झाले आणि त्याची **कनककुंडला** गर्भवती होऊन शिवभक्त असा दिव्य पुत्र झाला तेव्हां पूर्णभद्र यास अत्यंत संतोष झाला व नानाप्रकारचे आनंदोत्सव करून त्या पुत्राचें नांव **हारिकेशव** असें ठेविलें. नंतर तो हारिकेशव बालक चंद्रकले प्रमाणें वृद्धी पावूं लागला. त्या बालकास शिवध्याना खेरीज दुसरा कोणताही हव्यास नसे. आठ वर्षांचा झाल्यावर त्याचा वृतबंध केला तेव्हां तो नित्य शिवाचें नामस्मरण करून पार्थिवलिंग करून पूजन करीत असे. हें त्याचें लक्षण पाहून पित्यानें त्यास उपदेश केला कीं, आतां तूं अध्ययन करून ग्रहस्थाश्रमी राहून व पुत्रादिक लाभून वृद्धापकाळ झाल्यावर मग शिवाची आराधना करून स्वस्थ रहा. हें पित्याचें भाषण त्या बालकास न आवडून तो तेथून निघाला आणि **वाराणशीक्षेत्रीं** येऊन दृढ निश्चयानें उग्र

तपश्चर्या करूं लागला. तेव्हां शिव प्रसन्न होऊन त्यास असा वर दिला कीं, काशीक्षेत्रीं जे दुराचरणी लोक येतील त्यास तूं दंड करता हो आणि जे निश्चयानें काशीवास करून राहतील त्यांस ज्ञान व मोक्ष दाता हो. असा वर देऊन शिव आपल्या सन्निध **दंडपाणी** या नावानें त्याची स्थापना करून अंतर्धान पावला.

**ज्ञानवापी** तीर्थाची स्थापना. कृतयुगीं कोणी **जटिल** नामें गोसावी देशपर्यटण करीत करीत वाराणशी क्षेत्रीं आला आणि **देव गंधर्व ऋषि** आदीकरून सर्वांनीं पूजीत असें **शिवलिंग** पाहून साष्टांग प्रणाम करून आपणही पूजा करावी असें त्यास वाटलें; परंतु तेथें सर्व क्षारोदक होतें तें पाहून त्याणें आपल्या हातांतील त्रिशूलानें पृथ्वी खणून एक कूप निर्माण केला तेव्हां त्यांतून आमृतप्राय उत्कृष्ट उदक निघाले व त्या उदकानें तो नित्यशा शिवलिंगावर सहस्त्र कलश उदकानें अभिषेक करून पूजा करूं लागला. त्याची निष्ठा पाहून शंकर प्रसन्न झाले आणि त्यास वर दिला कीं, हा कूप **ज्ञानवापी** तीर्थ या नामें करून प्रसिद्ध होईल व यांत स्नान करून जे माझी पूजा करतील ते ज्ञानसंपन्न होतील " असा वर देऊन शिव त्या तीर्थांत अंतर्धान पावले.

पुढें हें क्षेत्र इतक्या वैभवास आलें कीं, असें क्षेत्र त्याकाळीं या भरतखंडांत दुसरें कोणतेंही नव्हतें. विद्या, ज्ञान, नीती, सदाचार आणि सद्बुद्धी, इत्यादि गुणांनीं संपन्न असून हें क्षेत्र इष्ट फलदायक आहे अशी जगतांत कीर्ती होती.

कोणे काळीं **अगस्ति** ऋषी लोपामुद्रा त्यांची पत्नी व अनेक विद्यार्थी सहित काशी क्षेत्रीं आश्रम बांधून तपश्चर्या करीत व विद्यार्थ्यांस अध्ययन सांगून रहात असतां इंद्रादिक सर्व देव अष्टदिक्पाल व देवगुरू आदिकरून सर्व काशीक्षेत्रीं आले आणि भागीरथी मणिकर्णिकादि तीर्थांत स्नान करून **कालभैरव, दंडपाणी**चीं दर्शनें करून **विश्वेश्वराचें** दर्शन व पूजन केलें; आणि क्षेत्राची अगम्य शोभा अवलोकन करून अत्यंत संतोष पावले. नंतर विंध्याचलाच्या दक्षिणप्रांती धर्मसंस्थापनार्थ **अगस्ती** मुनीस पाठवावें असा विचार करून सर्व देव अगस्ती मुनीच्या आश्रमास जाण्याकरितां निघाले. वनांतून मार्गक्रमण करीत असतां त्यांत नानाप्रकारचे पशू व जंतू वैरभाव टाकून परस्पर अत्यंत मित्रभावानें व आनंदानें विहार करीत आहेत; सिंह, व्याघ्र, हरणें, गाई, मेंढरें इत्यादि पशू एकमेकांवर माना टाकून अत्यंत प्रेमानें रहात आहेत, व तसेंच महा विषारी जंतू त्यांस लगटून लीला करीत आहेत व मुनीच्या अश्रमांतील ब्रह्मचारी विद्यार्थी समिधा व फुलें नेण्याकरितां आलेले ते पशू व जंतू समवेत नानाप्रकारच्या क्रीडा करीत असत. मुखानें पाठ चाललाच आहे तेव्हांप्रमाणें त्या आनंदवनांतील पश्वादिकांची निर्वैर स्थिती पाहून देवास परम आश्चर्य व आनंद झाला. आणि ह्मणाले कीं, आहाहा ! काय ही पुण्यभूमी आहे. हजारों वर्षें तपश्चर्या केली किंवा चारी वेदांचें सार्थ देखील पठण केलें तरी या **आनंदवनां**तील पशू जंतू प्रमाणें योग्यता येणें दुर्लभ आहे. तेव्हां धन्य या

**वाराणशी** क्षेत्राची आणि **आगस्त्य** मुनीच्या पुण्याश्रमाची! **अगस्त्य** मुनीनें देव आले असें पाहून त्यांचा सत्कार करून त्यांस आसनावर बसविलें नंतर एकमेकांचे कुशळप्रश्न झाल्यावर **अगस्त्य** मुनीची प्रार्थना करून त्यांस धर्मस्थापनार्थ दक्षिणेंत पाठविते झाले. तेव्हां अगस्त्य मुनी प्रीतिस्तव वारंवार काशीकडे अवलोकन करिते झाले परंतु परोपकारार्थ वाराणशी क्षेत्र सोडून जाणें भाग आहे हें जाणून विंध्याचळाचे दक्षिणेस पत्नीसह जाण्यास निघाले.

या प्रमाणें काशी क्षेत्राचें वैभव असतां कांहीं काल गेल्यावर शिवादिक सर्वदेव काशी क्षेत्राहून **मंदराचल** पर्वतीं गेले. त्याचें कारण पद्मकल्पांत स्वयंभू मन्वंतरी पृथ्वीवर अनावृष्टी होऊन भयंकर काळ पसरला त्याकालीं लोकांत धर्म, नीति आणि सदाचार यांचा लोप होऊन मनुष्यें एकमेकांस मारून मांस भक्षण करूं लागलीं. धार्मिक प्रजापालनकर्ता राजा कोणी राहिला नाहीं. तेव्हां **मनुचा पुत्र रिपुंजय** नामें काशी क्षेत्रीं तपश्चर्या करीत होता. त्यास **ब्रह्मदेव** प्रसन्न होऊन वर देते झाले कीं तूं **दिवोदास** या नामें करून [illegible] होऊन या पृथ्वीचें राज्य कर. तेव्हां दिवोदासानें ब्रह्मदेवाची प्रार्थना केली कीं मी राज्य करीपर्यंत शिवादिक देवानीं काशी क्षेत्रीं न राहतां स्वर्गीं वास करावा हें **दिवोदासाचें** भाषण ऐकून तुझे इच्छेप्रमाणें होईल असें सांगून **ब्रह्मदेव** स्वर्गलोकीं गेले.

दिवोदास ब्रह्मदेवाचा वर होतांच सृष्टीच्या वृध्यर्थ काशीविश्वेश्वर देवगणांसह वाराणशीहून निघून मंद-

राचल पर्वतीं कुशद्वीपीं जाऊन तेथें वास केला. त्याकाळीं शिवानीं काशी क्षेत्रीं अविमुक्तेश्वर नामें लिंगाची स्थापना करून तेथेंच अंतर्धान पावले. विष्णु आदिकरून सर्व देवांनींही आपापल्या नांवचीं लिंगें स्थापन करून शिव सन्निद्ध मंदराचलीं गेले.

पुढें काशी क्षेत्रीं दिवोदासानें कांहीं काळ राज्य केल्यावर विश्वनाथाच्या कृपेनें सुवृष्टी होऊन शांतता झाली आणि पूर्ववत लोकवृद्धी होऊन सत्कर्मांचा व सदाचरणाचा प्रसार होऊं लागला. तेव्हां वाराणशी क्षेत्रीं वास करावा अशी शिवादिकांची इच्छा उत्पन्न झाली. परंतु अगोदर दिवोदासास काशींतून दूर करावें ह्मणून शिवानीं प्रथम चौसष्ट योगिणीस काशी क्षेत्रीं पाठविलें त्या राजावर ईश्वराची कृपा असल्यामुळें योगिणी कडून त्यास कांहीं घालविणें झालें नाहीं ह्मणून त्या सर्व मणिकर्णिकेजवळ वास करून राहत्या झाल्या.

नंतर दिवोदासाच्या अधर्मी वर्तनाचें छिद्र पाहून त्यास काशीतून बाहेर घालवावें ह्मणून जगच्चक्षू सूर्यनारायण आले परंतु त्यांसही कोठें छिद्र मिळालें नाहीं मग तेही बारा रूपें धारण करून काशी क्षेत्रीं राहिले. हीं बारा आदित्याचीं स्थानें निरनिराळीं असून याचें दर्शन व पूजन केलें असतां सर्व पीडा दूर होतात. या विषयींची ऐतिहासिक प्रेमळ कथानकें काशीखंडांत आहेत. मग ब्रह्मदेव वृद्ध ब्राह्मणाचें रूप धरून काशी क्षेत्रीं आले. त्यानीं आपणांस या क्षेत्रांत दहा अश्वमेध करण्याचे आहेत या करितां सर्व सामग्री सिद्ध करून देण्याबद्दल राजाची प्रार्थना

केली व त्यानेंही ती मान्य केली नंतर ब्रह्मदेवानीं दहा अश्वमेध याग रुद्रतीर्थ नामें सरोवर होतें तेथें केले. तेव्हां त्यास दशाश्वमेध तीर्थ असें नांव पडलें. आणखी ब्रह्मदेवानीं या तीर्था जवळ दशाश्वमेधेश्वर व राजानें ब्रंह्मेश्वर नामें लिंगाची स्थापना केली. हें दशाश्वमेध तीर्थ व लिंग ब्रह्मदेवाचे वरदानें करून सकल दोषांपासून मुक्त करणारीं आहेत याविषयीं प्राचीन ऐतिहासिक कथा काशीखंडांत मनोवेधक आहेत.

नंतर एकामागून एक असे अनेक शिवगण काशी क्षेत्रीं येऊन त्यानीं आपआपल्या नांवचीं तीर्थें व लिंगें स्थापन करून तेथेंच राहिले. या गणांत पस्तीस गण मुख्य होते. आणि त्यानीं स्थापलं केलेल्या तीर्थाचें व लिंगाचें सेवन केलें असतां अत्यंत श्रेयस्कर आहे असें या स्थानाचें महात्म सांगितलें आहे.

असो. नंतर धुंडिराज ( गणपती ) आपल्या सैन्यासह ज्योतिषी ब्राह्मणाच्या रूपानें काशी क्षेत्रीं आले. आणि लोकांस भविष्यें व स्वप्नांच्या व ग्रहादिकांच्या फलश्रुति सांगूं लागले. तेव्हा काशीक्षेत्रीं या ब्राह्मणाची मोठी आख्या होऊन राजमंदिरांतील स्त्रियांनीं सत्कार पूर्वक राजवाड्यांत बोलावून आणिलें आणि त्याची पूजा करून नाना प्रकारचे इच्छित प्रश्न विचारले. त्यांचीं समर्पक उत्तरें दिलेलीं ऐकून राजाजवळ त्या जोतिषी ब्राह्मणाच्या अनेक गुणांविषयीं व त्याच्या उत्तम स्वभावाविषयीं मोठी प्रशंसा केली. ती राजानें ऐकून त्यास बोलावून आणवून त्यास पाहतांच आनंदानें परम सत्कारपूर्वक त्यास दिव्यस्थानीं बसविलें;

आणि त्याची पूजा केली. नंतर राजानें त्यास सांगितलें कीं मी संपूर्ण पृथ्वीचें राज्य करून यथाविधी प्रजापालन केलें व नानाप्रकारचे विषय भोगिले. तरी माझें अंतः करण सर्व कर्माविषयीं खिन्न झालें आहे तेव्हां पुढील भाविष्याचा विचार करून मला आपण सांगावें. राजाचें हें बोलणें ऐकून **धुंडिराजांनीं** सांगितलें कीं राजा तूं मोठा बुद्धिमान, पुण्यशील, बृहस्पती सारिखा वक्ता, चंद्राप्रमाणें लोकांवर प्रसाद करणारा, सूर्यासारखा तेजःपुंज, अग्नीसारखा प्रतापवान, कुबेराप्रमाणें संपत्तिवान्, रुद्रासारखा शासन कर्ता, धर्मासारखा मर्यादा ठेवणारा, हिमालयासारखा महत्वाचा, मेघांसारखा सर्व लोकांचा संताप हर्ता, आणि गंगेसारखा पवित्र असा तूं सकल गुणें करून व ऐश्वर्यें करून युक्त आहेस. परंतु आज पासून अठरावे दिवशीं उत्तरेकडून कोणी ब्राह्मण येऊन तुला उपदेश करील तेव्हां त्याचें वचन तूं मान्य कर ह्मणजे तुझें सर्व प्रकारें कल्याण होईल. असें सांगून **धुंडिराज** तेथुन निघाले आणि वाराणशी क्षेत्रीं अष्ट दिशेस आठ परिधानें छपन्न रूपें धारण करून राहिले. त्यांचीं निरनिराळीं नांवें स्थानें आणि महात्में **काशीखंडांत** वर्णन केलीं आहेत.

नंतर काशीक्षेत्रीं गरुडावर बसून विष्णु आले. त्यांनीं प्रथम वरुणा व भागीरथी संगमाजवळ उतरून तेथें स्नान केलें. तेव्हां पासून त्या स्थानास विष्णूपादोदक तीर्थ असें नांव प्रसिद्ध झालें. तेथें विष्णूनीं आदिकेशव नामें मूर्ती स्थापन केली. आणि त्या मूर्तीचें

Presented to THE PAV.. FREE LIBRARY-Dharmapuri, W... by K. V. Pandit in memory of his uncle the late Mr. Bapusaheb Pandit.


जे लोक पूजन अर्चन करतील ते वैकुंठीं वास करतील असा तीस वर दिला. आणि तेथून निघून काशीक्षेत्रीं अनेक तीर्थें व विष्णूमूर्ती स्थापन करून त्या सर्व ठिकाणीं अंशरूपानें राहिले. त्या सर्व स्थानांचें, मूर्तींचें आणि त्यांच्या माहत्माचें अत्यंत रसाळ व चित्तवेधक वर्णन क्षेत्र महात्मांत केलें आहे. या वेळीं विष्णूनीं गरुडास नानाप्रकारच्या धर्माचीं रहस्यें सांगितलीं आहेत. त्या धर्माचें मुख्य तात्पर्य हें कीं, १ भयाभीत झाले त्यांस अभय द्यावें. २ व्यथितास औषध द्यावें. ३ विद्यार्थ्यांस विद्या दान करावी आणि ४ क्षुधितांस अन्न द्यावें.

परोपकार करणें सर्व धर्माचें सार आहे. धर्मानें, संपत्तीनें आणि इच्छेनें, मन बुद्धी आणि पंचेंद्रियांच्या विषयवासना तृप्त कराव्या. याच ठिकाणीं स्वर्ग व नर्क आहे. सद्धर्माचरणानें विषयोपभोग करीत असतां सुखें करून निरिच्छ पणानें देह विसर्जन करावा हाच मोक्ष आहे.

याप्रमाणें काशीक्षेत्रीं विष्णूचा वास झाला. इकडे धुंडिराजानीं दिवोदास राजास सांगितल्या प्रमाणें अठरा दिवस पूर्ण झाले. तेव्हां विष्णूनीं ब्राह्मणाचें रूप धरून बरोबर लक्ष्मी व शिष्यरूपानें गरुडास घेऊन राजद्वारीं आले. ब्राह्मण आले हें वर्तमान राजास समजतांच तो सामोरा येऊन नमस्कार करून अग्रहपुरःसर अंतःपुरांत नेऊन त्यास बसविलें; आणि सत्कारपूर्वक पूजा करून हात जोडून पुढें उभा राहिला. राजाचा विनय व सत्कार पाहून ब्रा-

ह्मणानें त्याची स्तुति केली. आणि बोलला कीं, हे राजा, तूं यथाविधी प्रजापालन केलेंस परंतु तुझ्या कडून एक अपराध घडला आहे. तो हा कीं कल्याण- दायक शिव यास तूं काशी बाहेर घालविलेंस तेव्हां आतां तूं त्यांस शरण जाऊन व त्यांचें पूजन करून लिंग स्थापन कर. ह्मणजे तूं कृतकृत्य होशील. आणि तसें केल्यास आज पासून सातवे दिवशीं दिव्य विमा- नांत बसून जगपालक सांब येथें प्रगट होऊन तुला उपदेश करून मुक्त करतील. नंतर दिवोदास राजानें प्रधानादिकांस बोलावून राज्यासनावर पुत्रास बसवून प्रधानास राज्य कारभार सांगून आपण पंचगंगेच्या पश्चीम तीरीं उत्कृष्ट देवालय बांधिलें; आणि दिवो- दासेश्वर नामें लिंगाची स्थापना करून शिवाची आ- राधना करीत राहिला. इतक्यांत सात दिवस पूर्ण झाले. तेव्हां गरुडानें येऊन विष्णूस वर्तमान सांगि- तलें कीं विमानांत बसून विश्वनाथांचें अगमन होत आहे. तें ऐकून विष्णू, गणपति, ब्रह्मदेव, सूर्य, चौसष्ट योगिणी आणि सर्व शिवगण विश्वनाथास सामोरे जाऊन दर्शन होतांच परम आनंदानें जयघोष करून सर्वांनीं सांष्टांग नमस्कार केले. ब्रह्मदेवानीं फलमंत्रा- क्षता शिवास अर्पण केल्या. नंतर सांबानीं सर्वांस कृपादृष्टीनें अवलोकन केलें. इतक्यांत गोलोकांपासून **सुनंदा, सुमना, सुशीला, सुरभी** आणि **कपिला** या पांच कामधेनूंनीं आपल्या दुग्धधारेनीं विश्वना- थावर अभिषेक केला; तेव्हां त्या स्थानीं **कपिलाह्रद-** **या** नामें करून प्रसिद्ध तीर्थ झालें. नंतर शिव रथा

रूढ होऊन सकल देव, ऋषी, मुनी, गण, क्षेत्रवासी जनसमुदायक राजा या सहित परमोत्साहानें काशी क्षेत्रीं प्रवेश करिता झाला. त्या काळीं शिवानीं पार्वतीस सर्व तीर्थांचीं व स्थानांचीं महात्में निवेदन केलीं आहेत. नंतर कार्तीक शुद्ध १ बुधवारीं अनुराधा नक्षत्र चंद्र सातवा अशा सुमुहूर्तीं अंतरगृहीं निर्वाण मंटपीं प्रवेश केला. तेव्हां काशी क्षेत्रीं त्या सृष्टिकर्त्या विश्वेश्वरावर सर्व देवादिकांनीं अभिषेक व पुष्पवृष्टी करून तेथें त्याची प्रतिष्ठापना केली. आणि त्या सानिध्य सर्वांनीं वास केला. मग दिवोदासास सांबानीं प्रत्यक्ष दर्शन देऊन त्यास मुक्त केलें. हेंच स्थान पुढें काशीविश्वेश्वर या नामें करून प्रसिद्ध झालें.

असो या प्रमाणें विश्वेश्वराची स्थापना काशींत झाल्यावर तेथील महात्म पुष्कळ वाढलें व तेथें अनेक सत्पुरुषांनीं पुष्कळ तीर्थें स्थापन केलीं. त्याचें **काशीखंडांत** चांगलें चित्तवेधक वर्णन केलें आहे. त्यांतील मुख्य मुख्यां बद्दल थोडकेसें लिहितों.

१ पंचगंगातीर्थ हें धूतपापा, **किरणा, भागीरथी, गंगा** आणि **यमुना** ह्या पांच नद्यांचा धर्मनदास संगम होऊन झालें आहे.

२ मणिकर्णिकातीर्थ सर्वांस श्रेष्ठ आहे. येथें देवादिक सर्व लोक येऊन तीर्थाचें सेवन करितात.

३ जैगषव्य ऋषी फार प्राचीन काळा पासून काशी क्षेत्रीं तपश्चर्या करीत होते. त्यास **सांबानीं** प्रत्यक्ष दर्शन देऊन संपूर्ण योगसाधन विद्येचा ज्ञाता

होशील असा त्यास वर दिला तेव्हां त्यानें तेथें जै-गिषव्येश्वर नामें लिंगाची स्थापना केली. हें स्थान प्रसिद्ध आहे.

४ त्या काळीं काशी क्षेत्रीं पांच हजार संन्याशी होते. त्यानीं दंडानें खणून एक तीर्थ केलें. व लिंगाची स्थापना केली. हें स्थान प्रसिद्ध आहे. त्या सर्व सं-न्याशांस सांबानीं दर्शन देऊन मुक्त केलें.

५ तसेंच हिमाचल गिरीनें येऊन एक अत्यंत रमणीय रत्नजडित अपूर्व देवालय बांधून त्यांत चंद्रकांत मण्याचें लिंग स्थापन करून शैलेश्वर नांवानें त्याची पूजा करून काळ-भैरवाचें दर्शन घेऊन परत गेला. त्या-वेळीं राहिलेलें असंख्य द्रव्य व रत्नें भैरवा पुढें ठेविलीं. त्या द्रव्यानें दुसरें एक अपूर्व देवालय पार्वतीनें बांधून रत्नेश्वरालिंगाची स्थापना केली. या दोनी अपूर्व देवालयांतील लिंगांत सांबानीं अंशेंकरून वास केला आहे.

६ कृतिवासेश्वर आणि हंसतीर्थ—कोणे काळीं गजासूर नामें दैत्य उन्मत्त होऊन लोकांस पीडा देऊं लागला. त्यावेळीं शंकरानीं त्रिशूळानें त्याचा वध केला. परंतु प्राणोत्क्रमण समयीं तो शंकरास शरण गेला. तेव्हां त्याचें चर्म शंकरांनीं गृहण करून त्याचे नांवें कृतिवासेश्वर नामें लिंगस्थापना केलें. ज्या ठिकाणीं त्यास मारून त्रिशूळ जमिनींत ठोकला होता तो उपट-तांच तेथून दिव्य पाणी निघालें तेथें एक कुंड बांधलें. तें शंकरप्रसादानें पवित्र तीर्थ झालें पुढें यांत दोन

कावळे भांडत असतां येऊन पडले. तेव्हां त्यांचें शरीर पांढरें होऊन हंसरूपी झाले. तेव्हां पासून या तीर्थाचें नांव हंसतीर्थ असें प्रसिद्ध झालें.

आणखि भरतखंडांतील प्रसिद्ध क्षेत्रांतील व तीर्थांतील द्योतक लिंगें काशी क्षेत्रीं स्थापन झालीं आहेत. त्यांचीं मुख्य मुख्य नांवें:—१ कुरुक्षेत्रांतील कुरुक्षेत्रतीर्थ व स्थापूर नामक लिंग. २ गोकर्णाहून महाबळेश्वर लिंग. ३ प्रभासाहून शशिभूषण लिंग. ४ उज्जनीहून महाकाळेश्वर. ५ पुष्करतीर्थाहून अयोगेश्वर. ६ अट्टाहास तीर्थाहून महादेवेश्वर. ७ नैमिषारण्याहून देवदेव लिंग ८ मरुत्कटाहून मरुत्कटेश्वर. ९ विश्वनाथाहून विमलेश्वर. १० महेंद्र पर्वताहून महावृत्तेश्वर. ११ गयेहून पितामहेश्वर. १२ प्रयागाहून भूळशृंकेश्वर. १३ शंकुकर्ण तीर्थाहून महतेश्वर. १४ रुद्रकोटि तीर्थाहून महायोगेश्वर. १५ वोकांबरी तीर्थाहून कृतिवासेश्वर. १६ मरुजागलाहून चूडासेश्वर. १७ कलिंजर पर्वताहून नीलकंठेश्वर. १८ काश्मीराहून विजय लिंग. १९ त्रिदंडपुराहून स्वयभू लिंग. २० छगलतीर्थाहून कपर्दीश्वर. २१ अमृत केश्वराहून सूक्ष्म लिंग. २२ मधुकेश्वराहून जयंत लिंग. २३ श्रीशैल्याहून त्रिपुरांतकेश्वर. २४ सौम्य क्षेत्राहून कुकुटेश्वर. २५ जालेश्वराहून त्रिशूळेश्वर. २६ रामेश्वराहून जटिलेश्वर. २७ त्रिसंध्याहून त्र्यंबकेश्वर. २८ हरिश्चंद्र क्षेत्राहून हरिश्वर. २९ सुवर्ण क्षेत्राहून सहस्राक्ष लिंग. ३० हरीशीत क्षेत्राहून हरीशतिकेश्वर. ३१ केदारेश्वराहून ईशानेश्वर. ३२ रुद्र क्षेत्राहून रुद्रेश्वर. ३३ भैरवस्थाहून संहार-

भैरव मूर्ती. ३४ कनखल तीर्थाहून उग्रलिंग. ३५ देवदारुवनाहून दंडीश्वर. ३६ नेपाळाहून पशुपतीश्वर. ३७ करवीराहून कपालेश्वर. ३८ गंगासागराहून अमरेश्वर. ३९ सप्तगोदावरीहून भीमेश्वर. ४० विंध्याचलाहून धरणीवराहालिंग. ४१ किराततीर्थाहून किरातेश्वर. ४२ वराह तीर्थाहून त्रिलोचनेश्वर. ४३ आकाशांतून ज्योतिरूप लिंग आलें तें ज्ञानवापी तीर्था पुढें तारकेश्वर नामें करून प्रसिद्ध आहे. येथ पर्यंत काशीक्षेत्रींच्या पुराणांतरीच्या वर्णनाचा सारांश झाला आतां त्या नंतरचें वर्णन करतों.

काशीक्षेत्र फार प्राचीन काळापासून विद्यावैभवानें, संपत्तीनें, आणि सदाचरणानें जगविख्यात आहे. देशोदेशाहून अनेक राजे व श्रीमान लोक या क्षेत्रीं येऊन भक्तीनें व परोपकार बुद्धीनें यथाशक्ती द्रव्य खर्च करून चित्रविचित्र रमणीय देवालयें व त्यावर गगनचुंबित शिखरें बांधून तीं सुवर्णादिक धातूंनीं व नानाप्रकारच्या रत्नांनीं मढवून दिव्य प्रकाशमय करीत ( तेणें करून शिल्प कौशल्यादि कारागिरांच्या विद्येस उत्तेजन मिळून या विद्येची वृद्धी होत असे. ) अशीं असंख्य देवालयें होतीं. वेद व नानाविध शास्त्रांच्या शेंकडो पाठशाळा या क्षेत्रांत होत्या. तेथील विद्यागुरु शेंकडों विद्यार्थी आपल्याजवळ बाळगून निरपेक्ष बुद्धीनें त्यांस पाठ सांगीत. विद्यार्थी माध्यानकाळीं मधुकरी मागून जें मिळेल त्यांतून कांहीं गुरुजीस अर्पण करून शेष राहिलेलें आपण ग्रहण करून विद्याभ्यास करीत. विद्याभ्यास संपूर्ण झाल्यावर गुरुपूजा करून

त्यावेळीं शक्त्यनुसार गुरुदक्षिणा देऊन त्यांचा आशिर्वाद घेऊन मग आपआपल्या घरीं जाऊन गृहस्थ आश्रमीं रहात. काशीक्षेत्रीं राहून ज्यानीं सांग विद्याभ्यास केला त्याची भरतखंडांत सर्वत्र ठिकाणीं मोठी मान्यता असे. या काळीं ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ आणि संन्यास हे चारी आश्रम सर्व लोकांत यथास्थित चालत होते. लोकांत परस्पर द्वेष, मत्सर इत्यादि अनर्थकारक दुर्गुणांचा प्रवेश नव्हता. या आदिक्षेत्रांतील असंख्य देवालयांची व विद्यालयांची व्यवस्था सदोदित यथास्थित राहण्याकरितां देशोदेशींचे राजे व श्रीमान लोक साह्य करीत. गरीब अनाथ लोक करितां अन्नछत्रें ठेवून अन्नदान करीत. सारांश या भरतखंडांत विदेशी लोकांचा प्रवेश होईपर्यंत ह्मणजे शालिवाहन शकाच्या अकराव्या शतकाच्या आरंभपर्यंत काशीक्षेत्र सर्व भरतखंडाचें आदि विद्यापीठ होतें. तेथील विद्यावैभवाचा प्रभाव सर्व जगतावर पसरलेला होता. आणि या आदिक्षेत्रापासूनच सर्व भरतखंडांतील लोकांस धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चतुर्विध पुरुषार्थां विषयींचें ज्ञान, नानाविध विद्या, कला, सतबुद्धी, नीति, सदाचार इत्यादि सद्गुणांचा पाढा मिळत होता तेणेंकरून भरतखंडांतील सर्व प्रकारचे लोक स्वकुलाचा व स्वधर्माचा अभिमान बाळगून अत्यंत सुखशांतीनें राहत होते. असें असतां पुढें काळचक्रगतीनें या देशांत परदेशी व परधर्मी यवन लोकांचा संचार झाल्यावर त्यानीं जो या देशावर कहर केला तो इतिहासांतरी प्रसिद्ध आहे. भरतखंडांतील प्रख्यात देवस्थानें व त्यांतील मूर्ती फोडू-

न, तोडून मोडून जाळून नाहींशा करून टाकिल्या आणि येथील अपार संपत्ति लुटून नेली. देशाचे देश जाळून लुटून व लोकांच्या कत्तली करून उद्ध्वस्त केले. जे लोक सांपडले त्यांस जुलमानें बाटवून गुलाम व बायकांस बटिकी करून नेलें याप्रमाणें नानाप्रकारें या देशाची धूळधाण करून टाकिली तेव्हां अशा स्थितींत हिंदुधर्माचें व विद्येचें जें आद्यपीठ तें या क्रूर रानटी व मूर्तिपूजेचा पराकाष्ठेचा द्वेश बाळगणाऱ्या लोकांच्या तडाक्यांतून अर्थांतच सुटलें नाहीं. क्षेत्रांतील विश्वेश्वराचें देवालय जमीनदोस्त केलें व त्या ठिकाणीं भव्य मशीद बांधिली. तसेंच दुसऱ्या कित्येक देवालयांची अशीच वाताहत होत गेली, अशा भयंकर व दुर्घट प्रसंगीं तेथील लोकांवर जो कहर गुजरला असेल त्याची कल्पना वाचकांनींच करावी. आतां अकबरा सारख्या कांहीं बादशहांच्या कारकीर्दीखेरीज करून बाकीच्या सर्व मुसलमानी अमलांत ह्मणजे सुमारें पांच साहशें वर्षांपर्यंत भरतखंडांतील विख्यात वैभवाचा परोपरीनें ऱ्हासच होत गेला, पुढें मुसळास जसे अंकूर फुटावे त्याप्रमाणें विश्वनाथाच्या अगाध कौतुकानें महाराष्ट्र देशांत कूलभूषण जगविख्यात शिवाजी राजाचा अवतार झाला. त्याबरोबर सर्व महाराष्ट्रीय लोकांच्या आंगीं धैर्य व स्वदेशाभिमान ह्याचें स्फुरण येऊन त्यानीं आपल्या पराक्रमानें त्या हतभाग्य देशास त्या दुष्ट परकीय लोकांच्या हातांतून मुक्त करून स्वराज्याची स्थापना केली यापुढें यवनी राज्याचा उत्तरोत्तर ऱ्हासच होत गेला व या संधीच्या सुमारासच काशींतील

पुष्कळ भ्रष्ट झालेल्या मोडलेल्या अशा हिंदु लोकांच्या देवालयाचा जीर्णोद्धार झाला व तसेंच तीं थोडथोडी भरभराटीस येऊं लागलीं. असो; कोणत्याही देशाचा उत्कर्ष किंवा अपकर्ष होण्यास हें मुख्य कारण होय.

काशीक्षेत्राजवळ भागीरथीचा प्रवाह उत्तर वाहिनी असून तिच्या पश्चिम तीरीं क्षेत्राची वस्ती आहे. गंगेच्या पूर्व तीरीं राहून पाहिलें असतां क्षेत्राच्या भव्य इमारती गंगेचे घांट ह्यावरील निरनिराळ्या तऱ्हेच्या लोकांचा समुदाय नदींतून इकडून तिकडे जाणाऱ्या होड्या व पाण्याचा मोठा विस्तीर्ण खोल व गंभीर प्रवाह इत्यादि मोठा मनोहर व अपूर्व देखावा दृष्टीस पडतो. भागीरथीचे घाट दक्षिणेस आशी संगमा पासून उत्तरेस वरुणा संगमा पर्यंत एकंदर ८४ आहेत. ते. १ आशी संगम घांट २ हयबतरावाचा घांट ३ अमृतरावाचा ४ आपासाहेबाचा ५ अक्रूर घांट ६ नबाबाचा ७ स्वप्नेश्वर चा घांट ८ राजाचा घांट ९ शिवालय घांट १० हनुमंत घांट ११ केदारघाट १२ गौरीचा घांट १३ पिंपळाचा १४ क्षेमेश्वराचा १५ मानःसरोवर घांट १६ स्मशान घांट १७ नारद घांट १८ अमृतरावाचा ( येथें अन्नसंतर्पण होत असतें. ) १९ पांडे घांट २० भाऊसाहेबांचा २१ राणी भवानीचा २२ चौसष्टीचा २३ मुनशीचा २४ दशाहाराचा २५ अहल्याबाईचा २६ दशाश्वमेधाचा २७ शुळ-टंकेश्वराचा २८ अहल्याबाईचा जुना २९ मान मंदिर ३० वाराहीचा ३१ पाथ राजाचा ३२ वीरघांट ३३ मीर घांट ३४ मीराचा पुस्ता ३५ ललिता देवीचा

३६ राजराजेश्वरीचा ३७ उमराव गिरीचा ३७ मळशाईचा ३९ स्मशानचा ४० ब्रह्मनाळचा ४१ रत्नाबाईचा ४२ तारकेश्वराचा ४३ चक्रपुष्करणी मणिकार्णिकेचा ४४ भवानी दासाचा. ४५ कश्मरी मल्लाचा. ४६ आत्मा वीरेश्वराचा. ४७ पर्वतेश्वराचा. ४८ संकष्टीचा. ४९ गहना बाईचा. ५० यमधर्मेश्वराचा. ५१ वेणीराम पाटक नागराचा. ५२ भोसल्याचा. ५३ गुल्लराजाचा. ५४ गणेश मंदिराचा. ५५ अग्नेश्वराचा. ५६ रामघांट. ५७ चोरघांट. ५८ नव मढ्याचा. ५९ वेंकटेशाचा. ६० डिंढिवाचा चिमढीचा. ६१ पंचगंगेचा. ६२ रामानंदाच्या पादुका नरसिंह दादाचा. ६३ दिवढाचा. ६४ बिंदु माधवाचा याच्या पायऱ्या आहेत. ६५ दुर्गाघांट.

६६ चोरघांट }
६७ ब्रह्मघांट } या घांटावर यात्रस्थ लोक राहतात.

६८ नेचाघांट. ६९ शीतळाचा घांट. ७० पाय घांट. ( हा अगदीं सुलभ असल्यामुळें या वरून गुरें पाणी प्यावयास जातात. ) ७१ बाळाबाईचा घांट. ७२ बाळाजी वैद्याचा. ७३ क्षेत्र्यांचा. ७४ लाल घांट. ७५ त्रिलोचनाचा. ७६ प्रल्हादाचा. ७७ गोल्याचा. ७८ तेल्याचा. ७९ भिस्त्याचा. ८० राजाचा. ८१ स्मशानाचा. ८२ पुराणा कोट. ८३ विष्णू पादोदकांचा. ८४ वरुणा संगमाचा.

या पैकीं मणिकर्णिका तीर्थावर शिंद्यानीं बांधलेला घांट आहे. तो सर्वांपेक्षां मोठा आहे. परंतु तो जुना

ळाल्या मुळें कांहीं कलला आहे. शिंद्याच्या घांटा-च्या उत्तरेस नागपूरकर भोसल्यांचा घांट आहे. याचें काम फार चांगलें आहे. याच्या वरच्या बाजूस महाल व मनोरे उत्कृष्ठ बांधिले आहेत. दशाश्वमेधा नजीकचा अहल्याबाई होळकरीण हिचा घांट व पंचगंगेजवळील वेंकटेश उर्फ बाळाजी पेशव्यांनीं बांधलेला घांट याचेंही काम छानदार आहे. याशिवाय बाकीचे घांट वर सांगितलेल्या चार घांटांहून लहान आहेत तरी त्यांचीं कामें चांगलीं मजबूत व सुंदर आहेत. या सर्वांचें काम चारशें वर्षांच्या आलीकडील असावें कारण जुन्या इमारती, देवालयें व घांट यांचा बहुतकरून मुसलमानी अमलांत विध्वंस झाला आहे.

हे सर्व घांट गंगेच्या पाण्यापर्यंत आणून सोडले आहेत व त्यापासून पुढें पाण्यांत सुमारें १५।२० हात पर्यंत लांकडाचे किंवा वेळवाचे मोठ मोठे दोन दोन तीन तीन पुरुष उंचीचे डांब पुरून त्याला आडवे सार बांधून त्यावर तक्ते घालून चौके केलेले असतात. त्याजवर सकाळीं गंगेचें स्नान करून अनुष्ठानें करीत पुष्कळ लोक बसतात.

काशीक्षेत्रीं गेल्यावर तेथें यात्रेकऱ्यास यात्रा वगैरे कराव्या लागतात त्या व आणखि इतर स्थळें.

१—पंचतीर्थी यात्रा. प्रथम मणिकर्णिका तीर्थ स्नान क्षौरकर्म व श्राद्ध करावें; नंतर क्षेत्ररक्षक काळभैरवाच्या नांवानें काळाष्टक ह्मणोन एक अनुष्ठान करून आठ, चौसष्ट किंवा २९६ ब्राह्मणभोजन घालतात.

२—मणिकर्णिका तीर्थीं तीर्थविधी व श्राद्ध झाल्या-

वर आशी भागीरथी संगमावर एक, दशाश्वमेध तीर्थावर एक, पंचगंगा तीर्थावर एक, आणि वरुणा संगमीं एक अशा आणखी चार ठिकाणीं यात्रेकऱ्यास पितरांच्या नांवानें श्राद्धें करावीं लागतात. हीं कित्येक लोक त्या तीर्थांच्या नांवानें उतरलेल्या बिऱ्हाडींही करितात. हीं पांच तीर्थें भागीरथीच्या तीरीं तीन कोसाच्या टप्प्यांत आहेत. या यात्रेंत मुख्यत्वें १९ देवस्थानांचीं दर्शनें होतात.

३—पिशाच मोचन हें काशीक्षेत्राच्या पश्चिम दिशेस सुमारें दीड कोसावर यात्रेचें स्थान आहे. येथें विमलतीर्थ आणि कपर्दिकेश्वरांचें देवालयहीं मुख्य आहेत. विमलतीर्थ हें साधारण बरेंच मोठें सरोवर असून त्यास चारी बाजूनें घांट बांधले आहेत. दक्षिणेकडील घांट सुमारें ६०० वर्षांपूर्वीं **शिवशंबर** नामे राजानें बांधिला आहे. व त्याच्या कांहीं भागाचा जीर्णोद्धार थोड्या वर्षांपूर्वीं **विनायकराव साहेब** यानीं केला. पश्चिमेकडील घांट **बळवंतराव बाकिरा,** व त्यावरील बुरुज **मिरजाखुरमशा,** उत्तरेकडील सुमारें १०० वर्षांपूर्वीं **राजामुरलीधर,** आणि पूर्वेकडील कांहीं भाग सुमारें ८० वर्षांपूर्वीं **गोपाळदास साहू** या सावकारानें आणि घांटाचा बाकीचा भाग व देवालय कोणीं सावकाराची स्त्री **मृगाबाई** यानीं वर सांगितलेलीं कामें बांधविलीं.

या सरोवराच्या ठिकाणीं यात्रेकऱ्यांस अष्टमी, वद्य १४ शीस श्राद्ध करावें लागतें ज्यांच्या घरांत पिशाच्यादिकांचा उपद्रव असेल त्यानें आणखी एक त्रिपिंडी श्राद्ध करावें लागतें. या तीर्थांत स्नान करून

श्राद्धें केलीं असतां ब्रह्मराक्षसादि पिशाच्चयांच्या पीडा दूर होतात असा शंकराचा वरप्रसाद आहे. या विषयीं अनेक चमत्कारीक दाखले सांगतात. येथें पौष्य वद्य १४शीस प्रतिवर्षीं मोठी यात्रा जमते व ह्यास रोटचा भटांचा मेळा ह्मणतात. रांगडे लोक मुळें घालून कणिकेचे रोट आणून येथें खातात. काशी क्षेत्रांत पिशाच मोचनाची यात्रा केली नाहीं तर त्यास गयेची यात्रा करण्याचा अधिकार नाहीं इतकेंच नव्हें तर कोणी यात्रेकरी काशी प्रयागची यात्रा करून पिशाच मोचनाची यात्रा न करितां गयेस गेला तर तेथील गयावळ त्यास त्या बद्दल विचारतात. आणि गयेंत पिशाच मोचनाचें स्थान अक्षय व राजतळ आहे. तेथें प्रथम पिशाच मोचनाची यात्रा करवून नंतर गयावर्जन करतात.

पिशाच्च मोचनाच्या तीर्थाजवळच श्रीलक्ष्मीनारायणाच्या मूर्ती व पंचमुखी गणपतीचें स्थान हीं आहेत. त्याच अंगास एक कुंड आहे. त्यास सूर्यकुंड असें नांव आहे. या तीर्थांत पूर्वीं १२ कुंडें होतीं असें सांगतात. हल्लीं २ कूप मात्र आहेत. ह्या कुंडाच्या एका बाजूस घांट आहे, व घांटावर सूर्यनारायणाचें देवालय आहे हें बुंद्धिकोट्याच्या राजानें बांधिलें आहे असें ह्मणतात या देवालयांत पाषणाचें मोठें सूर्ययंत्र आहे. त्याची रविवारीं पूजा आदरानें लोक करतात. व येथें होमही करावा लागतो. या तीर्थांत स्नान करून सांबादित्याची पूजा केली असतां कुष्ठरोग परिहार होतात असें या स्थानाचें महात्म्य आहे.

४–नित्ययात्रा श्लोक–विश्वेशं माधवं धुंढिं दंडपाणींच भैरवं ॥ वंदे काशी गुहां गंगा भवानीं मणिकर्णिका ॥ १ ॥ या श्लोकाच्या अनुक्रमाप्रमाणें प्रथम स्नान करून काशीविश्वेश्वराचे देवालयांत जाऊन देवदर्शन करावें. हें फार मोठें नसून त्याची बांधणावळ जुन्या चाली प्रमाणेंच आहे. याचें शिखर भिंतीच्या वरच्या गलथ्या पासून सुमारें ३५, ३६ हात उंच आहे. व तें सर्व तांब्याच्या पत्र्यांनीं मढविलेलें असून त्याजवर सोन्याचा मुलामा केलेला आहे. तसेंच दरवाज्यालाही तांब्याच्या पत्र्यानीं मढवून त्याजवर सोनेरी मुलामा चढविला आहे. हें काम पंजाबचा पूर्वीचा राजा रणजितसिंह यानें केलें आहे. देवालयांत सुमारें नऊ घांटा टांगलेल्या आहेत, त्यापैकीं एक घाट नेपाळच्या राजानें टांगली आहे. तिचें काम फार उत्तम असून पाहण्यासारखें आहे. देवालयांत उत्तरेच्या अंगास एक सोपा आहे, त्यांत पुष्कळ मूर्ती स्थापन केलेल्या आहेत. विश्वेश्वराच्या देवालयाच्या उत्तरेच्या बाजूस ज्ञानवापी तीर्थ आहे, येथें ज्ञानवापीचा तीन दालनी मंटप बायजाबाई शिंदे हिनें सन १८१८ इसवींत दहा अंकण बांधला आहे. या मंटपाचें छताचें काम चांगलें आहे. बिंदुमाधवाचें देवालय विश्वेश्वराच्या देवालयाच्या ईशान्य दिशेस सुमारें एक मैलावर आहे हें देवालय देखील आपल्या मूळच्या स्थानावर नाहीं कारण ही जागा औरंगजेबाच्या ९५ हाताच्या उच दोन मनोऱ्यांच्या मसीदीनें बळकाविली आहे. हल्लींचें बिंदुमाधवाचें देवालय या

मशीदीच्या उत्तरेस जवळच पंचगंगेच्या घांटावर आहे. मूळच्या देवालयांतील बिंदुमाधवाची मूर्ती हल्लीं एका सावकाराच्या घरीं आहे. तिचें दर्शन प्रातःकाळीं प्रहर दिवस पर्यंत घेतां येतें. धुंडिराज विनायक व दंडपाणी यांचीं देवालयें विश्वेश्वराच्या देवालयाच्या पश्चिमेस व विश्वेश्वराच्या दक्षिणेस अशीं आहेत. अगोदर दंडपाणीचें दर्शन घेऊन मग विश्वेश्वराचें दर्शन घ्यावें, कालभैरवाचें देवालय बिंदुमाधवाचे देवालयाच्या नैऋत्येस सुमारें पाऊण कोसावर आहे. हा भैरव काशीक्षेत्राचा मुख्य रक्षक व शास्ता आहे. व याच्या उत्पत्ति स्थापनेबद्दल वर लिहिण्यांत आलेंच आहे. असो. येणेंप्रमाणें या क्षेत्रासंबंधानें थोडक्यांत माहिती आहे.

---

## गयावर्णन.

समस्त उत्तम पुरुष जाण । गयेस देती पिंड दान । देव त्यातें ह्मणती धन्य । येर पाषाण नरदेहीं ॥ १ ॥ भारद्वाजाचा आश्रम । गंगा यमुना संगम । प्रयाग तीर्थराज हें नाम । तया ठाया बोलिजे ॥ २ ॥ वैकुंठ कैलास एक मिळणी । काशी रुपें पातले धरणीं । ह्मणोनि धूर्जटी मुरारी दोन्ही । एके ग्रामीं वसिन्नले ॥ ३ ॥ बिंदुमाधव आणि धूर्जटी । सुख संवाद करिती गोष्टी । मोक्ष विके फुकासाठीं । समस्तांतें सारिखा ॥ ४ ॥

मुक्तेश्वर.

आतां काशिप्रताप ग्रंथाधारें कांहीं निवडक रहस्यांचा येथें समावेश करितों.

अन्यानि मुक्ति क्षेत्राणि काशी प्राप्ति कराणिहि ।
काशीं प्राप्यविमुच्यंते नान्यथा तीर्थ कोटिभिः ॥
प्रयागादप्य विमुक्तं तीर्थ राजा द्विशिष्यते ।
यथाविमुक्तो निर्वाणं न यथाकाप्य संशयं ॥ १ ॥

अर्थ– या भूमंडळांत अन्य जितकीं क्षेत्रें मुक्तिदायक आहेत तीं सर्व जीवांस काशींत प्राप्त करविणारीं आहेत. काशींत प्राप्त होऊन मुक्त होत आहेत या वांचून दुसऱ्या कोटी तीर्थांनीही मुक्ति होत नाहीं. प्रयाग जो तीर्थराज आहे त्याहूनही काशी विशेष आहे. कारण जसें काशींत निर्वाण आहे तसें कोठेंही नाहीं हें निःसंदेह आहे. दुसरें–पृथ्वींत जितकीं देवतें, तीर्थें आणि क्षेत्रें आहेत तीं सर्व काशींत वास करीत आहेत असें ब्रह्मवैवर्त पुराणांत सांगितलें आहे.

तीर्थानि सर्वाणि पुरश्च सर्वास्तथा शिवस्यायतनानिषष्ठिः । नद्योनदाःससरःसागराश्चदेवाःसमस्ताघुनयश्चसर्वे ॥ वसंति काश्यांसततं स्वशुद्धये ॥ विश्वेश्वरस्याद्भुतमुक्तिजन्मनः ॥

अर्थ--सर्व तीर्थें, संपूर्ण पुऱ्या, शिवाचीं साठ स्थानें, सकल नद्या, सारे नद, अवघीं सरोवरें, सगळे सागर, निरंतर अद्भुत मुक्तिदाता जो विश्वेश्वर त्याचे काशींत आपले शुद्धिकरितां वास करीत आहेत.

केचिन्नाम्नाकेपिसंदर्शनेनकेचिद्गत्वास्नानमात्रेण

दा.क्र. 15153

केचित् ॥ केचिद्देवं दक्षिणीकृत्य केचित् पूजांकृत्वा केपिमुक्ताबभुवु ॥

अर्थ—कोणी काशीचे नामोच्चारानें, कोणी दर्शनानें, कोणी काशींत जाऊन स्नानमात्रें करून, कोणी विश्वेश्वराची प्रदक्षिणा करून आणि पूजा करून मुक्त जाहले आहेत.

महापातकयुक्तोपिश्रद्धया रहितोवा ।
काशीप्रवेशादनघः सम्यक्स्थित्वा सुखीभवेत् ॥

अर्थ—महापातकी असो किंवा श्रद्धारहित असो, काशीचे प्रवेश मात्रें करून निष्पाप होऊन जात आहे. उत्तम प्रकारें वास करील तर नित्य सुखी अर्थात मुक्त होऊन जात आहे. यात्रेंत वाहनारोहण करून गेल्यान अर्धफल नष्ट होत आहे. उपानह आणि छत्र धारण करण्यानें चतुर्थांश फल नष्ट होऊन जातें. केवळ नग्न चरणानीं चाललें असतां संपूर्ण फललाभ होत आहे. जे याना शिवाय चालण्यास असमर्थ आहेत त्यांस बैलांचे गाडी खेरीज इतर यानावर आरोहण करून गेल्यानें यानाचा दोष नाहीं. बैलांचे गाडीनें संपूर्ण फल नष्ट होत आहे इतकेंच नाहीं, प्रत्युत गोवधाचे तुल्यतेचें पापही होत आहे. नौकेचे यानांत यान दोष नाहीं. जे कांहीं प्रसंगानें यात्रा करितात त्यांस अर्धफल होतें. जे कोणी दुसऱ्याकरितां धन घेऊन यात्रा करितात त्यांस षोडशांस फल होतें. यात्रार्थ घरांतून निघून न जातां पुनः घरीं जाईल तर तो प्रायःश्चिती होतो. जे मार्गांत यात्रिक लोकांस चोर, व्याघ्रादि यांपासून रक्षण करितात त्यांस अष्टगुण -

होत आहे. जे दुसऱ्यास यात्रेकरितां धनादिकीं सहाय्यता करितात त्यांस चतुर्गुण फळ प्राप्त होत आहे. यात्रा करीत असतां जर मार्गांत मृत्यु प्राप्त झाला, तर ऋषीलोक लाभ होत आहे. मार्ग चालण्यांत काम, क्रोध आणि लोभ यांचा जय, हस्त, पाद आणि मन यांचा दृढ संयम, प्रतिगृहत्याग, दंभ आणि कापट्य यांचें राहित्य आणि एकवार लघु आहार करून स्नान पूर्वक माध्यान्ह पर्यंत चालावें मध्यान्हीं स्थिती करून भोजन पूर्वक त्या रात्रीस तेथेंच वास करावा. भोजनोत्तर मार्ग चालूं नये. दुसरे दिवशीं प्रातः काळीं स्नान करून पुनः मार्ग चालावा.

द्वादश्यांप्रातरेवाद्यांकाशींयः पूजयेत्सुधीः ॥
तस्यपापेनरमते बुद्धिर्धर्मे प्रवर्तते ॥

अर्थ—द्वादशीचे दिवशीं प्रातःकाळीं गंगाकेशवाचे समीप काशीमूर्तीचें पूजन केलें ह्मणजे पापांत बुद्धि रमत नाहीं. धर्मांत प्रवृत्त होते. काशीखंडांत सांगितलें आहे.

एकादश्यामुपोष्याथप्राश्नातिचुलुकत्रयं ॥
ऱ्हदयेतस्यजायंतेत्रीणिलिंगान्यसंशयं ॥

अर्थ—एकादशीस उपवास करून दुसरे दिवशीं द्वादशीस ज्ञानवापीचे तीन चुळके जळपान करावें. ह्मणजे ऱ्हदयांत तीन लिंगें होतात.

अन्यक्षेत्रेकृतंपापं पुण्यक्षेत्रेविनश्यति ।
पुण्यक्षेत्रकृतंपापं गंगातीरे विनश्यति ॥
गंगातीरे कृतं पापं काशीं प्राप्य विनश्यति ।
काश्यांतुयत्कृतं पापं वाराणस्यां विनस्यति ॥

वाराणस्यांकृतं पापं मवि मुक्ते विनश्यति ।
अविमुक्तेकृतं पापं मंतर्गेहे विनश्याति ॥
अंतर्गेहेकृतं पापं वज्रलेपो भविष्याति ।
वज्रलेपच्छिदत्थे तत्पंचक्रोश प्रदाक्षिगं ॥
तस्मात्सर्व प्रयत्नेन कुर्यात्क्षेत्र प्रदाक्षिणं ।

अर्थ—अन्य कोणतेही स्थानीं पाप केलें असेल तरी पुण्यक्षेत्रीं गेल्यानें नष्ट होत आहे पुण्यक्षेत्रीं केलेलें पाप गंगा तीरीं नष्ट होतें. गंगातीरीं केलेलें पाप काशी प्राप्त होण्यानें नष्ट होतें. काशिंत केलेलें पाप त्याचे आंत अविमुक्त आहे तेथें नष्ट होतें. अविमुक्तांत केलेलें पाप त्याचे आंत अंतगृह आहे तेथें नष्ट होतें. अंतर्गृहीं केलेलें पाप वज्रलेप होत आहे; ह्मणजे वज्र जसें कोणावर पडलें असतां त्यास सोडीत नाहीं, घोर आघातच करीत आहे तसेंच हें पाप कर्त्यास सोडीत नाहीं, लिप्तच करीत आहे आणि नाश करीत आहे, त्या वज्रलेप पापानें छेदन करणारी ही पंचक्रोशी प्रदक्षिणाच आहे, या करीतां संपूर्ण प्रयत्नें करून पंचक्रोशी प्रदक्षिणा अवश्य केली पाहिजे.

काशीप्राप्तिरयंयोगः काशी प्राप्तिरिदंतपाः ।
काशी प्राप्तिरिदंदान काशीप्राप्तिःशिवैकता ॥

अर्थ—काशीप्राप्त होणें हाच योग आहे. काशीप्राप्त होणें हेंच तप आहे. काशी प्राप्त होणें हेंच दान आहे; आणि काशी प्राप्त होणें हेंच शिवा समागमें एकता होणें आहे असें काशीखंडांत सांगितलें आहे.

तीर्थांतराणिक्षेत्राणि मुक्तिपुर्यश्चनारद ।

**अंतःकरणसंशुद्धि जनयंतिनसंशयः ॥**
**वाराणस्यापि देवर्षे तादृश्येव परंतुसा ।**
**प्रकाशयति ब्रह्मैक्यंतारकस्योपदेशतः ॥**

अर्थ—अन्यतीर्थ, अन्यक्षेत्र, आणि अयोध्या, मथुरा इत्यादि मुक्तिपुऱ्या अंतःकरणास अतिशुद्ध करीत आहेत. यांत संदेह नाहीं. वाराणशीही तशीच आहे. परंतु ती तारकाचे उपदेशें करून ब्रह्मैक्याचा प्रकाश करीत आहे. तेणें करून सद्यः मुक्ति होत आहे. तो तारकमंत्र कोणता आहे तो काशीखंडांत सांगितला आहे:—

**अनिलोमृगनाभिरेणुगंधि रधिकाशिप्रणवोतदेशकाले । हरतेमरणश्रमंनराणांहरवामार्धकुचोत्तरीयजन्मा ॥**

अर्थ—हराची वामार्धा जी पार्वती; तिचे आच्छादन वस्त्रेंकरून उत्पन्न आणि कुचलिप्त कस्तुरीचे चूर्णे करून सुगंधित जो वायु, तो काशींत जिवाचे प्रणवमंत्राचे उपदेश काळीं जेव्हां भगवान् विश्वेश्वर तारक मंत्र प्रणवाचा उपदेश करीत आहेत, त्या समयीं त्यांचे वामशरीरार्धस्थित अन्नपुर्णा आपले वस्त्राचे पदरानें मुमूर्षू जो त्याचे मरणक्लेश दूर करण्याकरितां वारा घालित आहेत. यावरून काशींत मरणाचेही क्लेश होत नाहींत. या करितां—मरणं मंगलं यत्र । असें ह्मटलें आहे.

काशीच्या मरणांत काळाचेंही कांहीं विशेष नाहीं जेव्हां मरण होईल तेव्हांच मुक्ति होते असें काशीखंडांत सांगितलें आहे.

**उत्तरं दाक्षिणं वापि अयनं न विचारयेत् ॥**
**सर्वोप्यस्य शुभः कालोह्यविमुक्तेम्रियेतयः ॥**

अर्थ–उत्तरायण अथवा दक्षिणायन यांचा विचार न करावा. जो मृत होईल त्यास संपूर्ण शुभकालच आहे. तसाच स्थलाचाही विचार करण्याचें प्रयोजन नाहीं. सनत्कुमार संहितेंत सांगितलें आहेः–

**रथांतरे मुत्रपुरीषमध्यें चांडाल वेश्मन्य थवा स्मशाने । कृत प्रयत्नोप्यकृत प्रयत्नो देहावसानें लभतेच मोक्षं ॥**

अर्थ–मार्गांत, मुत्र अथवा विष्टा यांत, चांडालाचे गृहांत अथवा स्मशानांत ह्मणजे कोठेंही प्रयत्न केलेला असो किंवा नसो, येथें देहाचे अंतिं मोक्ष होत आहे. पद्मपुराणांतही सांगितलें आहेः–

**भूमौजलेंतरिक्षेवायत्रक्वापिमृतोद्विजः ।**
**ब्रह्मात्मैक ह्यमाप्नोति काशिशक्ति रुदाहृता ॥**

अर्थ–भूमींत, जलांत, अंतरिक्षांत कोठेंही प्राणी मृत होऊन ब्रह्म आणि जीवात्मा यांचे एकतेंस प्राप्त होत आहे. अशीच काशीची शक्ति आहे. येथें दुर्मरणाचाही दोष नाहीं. पद्मपुराणांत सांगितलें आहे.

**सूचग्रमात्रमपिनास्ति ममास्पदेस्मिन् ।**
**स्थानेसुरेश्वरिमृतस्यनयत्रमुक्तिः ॥**
**भूमौजलेवियतिवाशुचिमध्यतोवा ।**
**सर्पाग्निदस्युपाबिभिर्निहितस्यजंतोः ॥**


अर्थ–शिव सांगताहेत-मृताची मुक्ति न होईल असें सुईचें अग्रमात्रही या काशींत स्थान नाहीं. भूमींत, जलांत, अंतरिक्षांत आणि अपवित्रस्थळीं आणि सर्प,

अग्नि, चोर आणि विद्युल्लता यांच्यायोगें मरण प्राप्त झालें ह्मणजे कसेंही दुर्मरण आलें असो तथापि मुक्ति होत आहे.

एकएवप्रभावोस्ति क्षेत्रस्यास्यवरानने ।
एकेनजन्मनादेविमोक्षं प्राप्स्यत्यनुत्तमं ॥

अर्थ—या काशीक्षेत्राचा एकच हा मोठा प्रभाव आहे कीं, एकच जन्मानें उत्तम मोक्षलाभ होत आहे.

समाप्त.



Presented to "THE PRIVATE FREE LIBRARY-Dharmapuri, Wai" by K. V. Pandit. in memory of his uncle the late Mr. Bapusaheb Pandit.

टिळक ग्रंथसंग्रहालय
दा.क्र. 15178

९ ५ ९५०९। ३२फि |१२